चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
१५ जानेवारी, २०२०
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# स्थानिक गुन्हे शाखेची अवैध नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या दुकानात धाड

## एका आरोपीसह ८८ हजार २०० रू. चा मुददेमाल जप्त

दिनांक १४/०१/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चंद्रपुर शहरात अवैध नायलॉन मांजा व्यवसायिकाविरूध्द कार्यवाही करण्याबाबत पेट्रोलींग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, चंद्रपुर शहर येथील निशा ट्रेडर्स, गोलबाजार या दुकानात एक इसम पंतग, रिल मांजा सह नायलॉन मांजा साठवुन लपुन विक्री करीत आहे. अशा माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर दुकानात छापा टाकला असता, दुकानदाराच्या ताब्यात खालीलप्रमाणे अवैध नायलान मांजा मिळुन आला.

१) मोनोकाईट फायटर २५ रिल मांजा प्रत्येकी किं. ८०० रू प्रमाणे किं. २०,०००/—रू,
२) मोनोकाईट १२ रिल मांजा प्रत्येकी किं. ६०० रू प्रमाणे किं. ७,२००/—रू,
३) ऑल आउट ३६ रिल मांजा प्रत्येकी किं. ५०० रू प्रमाणे किं. १८,०००/—रू,
४) के कोब्रा ५० रिल मांजा प्रत्येकी किं. ५०० रू प्रमाणे किं. २५,०००/—रू,
५) अर्धवट ६० रिल मांजा प्रत्येकी किं. ३०० रू प्रमाणे किं. १८,०००/—रू

असा एकुण ८८,२००/—रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयात दुकानदार आरोपी नामे आकाश वासुदेव गिडवाणी वय २७ रा. सिंधी कॉलोनी चंद्रपुर यास अटक करण्यात आली असुन पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे कलम ५,१५ पर्यावरण संरक्षण कायदा १९४६ सहकलम १८८ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---